# नवीन बँकिंग व्यवस्था व धोरण दिशादर्शक ठरेल

## - आय.डी.बी.आय. बँक व्यवस्थापक डॉ. पराग खराटे

( 20.09.2018 )भविष्यात बँकिंग क्षेत्रात मोठे बदल होण्याची शक्यता असून शासनाच्या धोरणानुसार बँक व्यवस्थेत मोठे बदल घडून येतील, बँकेचे स्वरूप बदललेले असेल. भविष्यात पोस्ट बँक व विविध कंपन्यांच्या बँकिंग व्यवहाराला महत्व प्राप्त होईल व भारतीयांना आर्थिक सुरक्षितता लाभेल असे प्रतिपादन आय.डी.बी.आय. बँकेच्या नवी मुंम्बई शाखेचे व्यवस्थापक डॉ. पराग खराटे यांनी बोदवड महाविद्यालयात केले.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथील वाणिज्य विद्याशाखेच्या वतीने आयोजित भारतीय बँकेचे स्वरूप या विषयावर  डॉ. खराटे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापक डी.एस. पाटील व्यासपीठावर उपस्थित होते, कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी.एस. महाले यांनी केले. तर आभार प्राध्यापक डॉ. शरद काठोके यांनी मानले. डॉ. पराग खराटे यांनी प्राचार्य अरविंद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एचडी. पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासठी प्रध्यक कोटेचा, प्राध्यापक पेंदाम यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



